**<u>विशेष दिवाणी मुकदमा नं. १४५/२०१८ नि.क्र.२२ वरील आदेश</u>**
**<u>प्रदीप कदम वि. अभिजीत चव्हाण</u>**
**<u>CNR NO.MHSN020012592018</u>**

१. प्रतिवादी यांनी, त्यांच्या विरुध्द 'एकतर्फा' असा जो आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी मुळ दावा नुकसानभरपाईसाठी व रक्कम वसुलीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना दाव्याचे समन्स दिनांक ०५/११/२०२२ रोजी लागु झालेले होते. परंतु ते सन २००७ पासुन मेंदुच्या विकाराने आजारी आहेत, तसेच त्यांना ब्लड प्रेशरचा त्रास आहे. तसेच त्यांना कोरोना होवुन गेल्यामुळे अशक्तपणा आलेला आहे तसेच त्यांना पाठीच्या हाडाचादेखील विकार आहे. या सर्व शारिरिक व्याधींमुळे प्रतिवादी यांना विहीत मुदतीमध्ये केसकामी हजर होता आले नाही व पर्यायाने त्यांना केसकामी म्हणणे सादर करता येवु शकले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द जो 'एकतर्फा' असा आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेकरीता प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जास अनुषंगून वादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांनी प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे. परंतु, वैकल्पीकरित्या अर्ज मंजुर केल्यास, प्रतिवादी यांना ३०००/– रुपये कॉस्ट करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे.

४. उभय पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांना अनुसरुन पुढील विवाद मुद्दा माझ्या समोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी यांचे विरुध्द 'एकतर्फा' असा झालेला आदेश, रद्द होणेस पात्र ठरतो का ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. सदर अर्जास अनुसरुन मुळ दाव्याचे अवलोकन केले. सदरचा दावा हा नुकसानभरपाईसाठी व रक्कम वसुलीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांना नोटीस प्राप्त होवूनही ते हजर राहिले नाहीत म्हणून त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला.

६. निर्विवादपणे प्रतिवादी यांनी अर्जात कथन केल्याप्रमाणे त्यांना अनेक व्याधी झालेल्या आहेत असे प्रथमदर्शनी गृहीत धरण्यास कोणतीही अडचण नाही. सर्वसाधारणपणे कोरोना झाल्यानंतर त्या पेशंटला काहीतरी शारिरिक व्याधी होते असेदेखील सध्या निदर्शनास येत आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना कोरोना झालेला होता त्यामुळे त्यांची शारिरिक परिस्थिती खालावल्यामुळे त्यांना अनेक डॉक्टरांकडे जावे लागत होते.

परंतु असे असले तरी सुध्दा प्रतिवादी यांना दिनांक ०५/११/२०२२ रोजी समन्सची बजावणी झालेली होती. त्यानंतर तब्बल नऊ महिने प्रतिवादी केसकामी हजर राहिलेले नाहीत. त्यामुळे केसच्या स्वरुपाचा विचार करता प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे केसकामी दाखल करणे गरजेचे असले तरी प्रतिवादी यांनी मुलतः हजर होण्यास

उशिर केलेला आहे ही बाब नाकारता येण्यासारखी नाही. परंतु, प्रतिवादीविरुध्द वादींनी रकमेच्या वसुलीसाठी दावा दाखल केलेला असल्यामुळे सदरहु दाव्यामध्ये वादींच्या तक्रारीचे खंडण करण्याची संधी प्रतिवादी यांना मिळणे आवश्यक आहे. जर प्रतिवादी यांची कैफियत रेकॉर्डसदरी दाखल करुन घेतली नाही तर सदरहु दावा गुणदोषावर निकाली होवु शकणार नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द अन्यायकारक हुकुमनामा केल्यासारखे होवु शकेल. त्यामुळे दावा चालवताना प्रतिवादी यांना त्याची बाजु मांडण्याची पुरेशी संधी मिळण्याच्या दृष्टीने प्रतिवादीविरुध्द पारीत करण्यात आलेला एकतर्फा आदेश रद्द करणे आवश्यक ठरते. परंतु तसे करत असताना, प्रतिवादी हे उशिराने केसकामी हजर होत असल्यामुळे त्यांनी माफक प्रमाणात कॉस्ट वादी यांना देण्याच्या पुर्वलक्षीत अटीवर अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी यांचा नि.२२ कडील त्यांच्याविरुध्द झालेला दावा 'एकतर्फा ' चालविण्याचा आदेश, त्यांनी ५००/– इतकी कॉस्ट वादी यांना देण्याच्या पुर्वलक्षीत अटीवर मंजुर करण्यात येत आहे व प्रतिवादी सादर करत असलेली कैफियत स्वीकारण्यात येत आहे.

२. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.08.18 10:49:47 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**
**दिनांक – १७/०८/२०२३** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगते की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व.स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | १७.०८.२०२३ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | - | १८.०८.२०२३ |